**पिंपरी चिंचवड महानगरपालिका**
**ग प्रभाग कार्यालय**
**कार्यपत्रिका क्रमांक - ३**
**सभावृत्तांत**

दिनांक - ४/६/२०१८ वेळ - **सकाळी** ११:०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या **ग** प्रभाग समितीची मासिक सभा सोमवार दि.०४/०६/२०१८ रोजी सकाळी ११.०० वाजता ग प्रभाग कार्यालयाचे **"ग्रामदैवत बापुजी बुवा सभागृह"** येथे आयोजीत करणेत आली होती सदर सभेस खालीलप्रमाणे मा.नगरसदस्य उपस्थित होते.

१. **मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन - सभापती**
२. मा.कदम निकीता अर्जुन
३. मा.संदीप बाळकृष्ण वाघेरे
४. मा.उषा संजोग वाघेरे
५. मा.पवार मनिषा प्रमोद
६. मा.अभिषेक गोविंद बारणे
७. मा.कैलास ऊर्फ बाबा भालचंद्र बारणे
८. मा.ॲड भोसले सचिन सुरेश
९. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब
१०. मा.निलेश हिरामण बारणे
११. मा.सविता बाळकृष्ण खुळे
१२. मा.सुनिता हेमंत तापकीर
१३. मा.चंद्रकांत बारकु नखाते
१४. मा.गोपाळ काशिनाथ माळेकर - स्विकृत सदस्य
१५. मा.विनोद हनुमंत तापकिर - स्विकृत सदस्य

तसेच खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

श्रीमती स्मिता झगडे – क्षेत्रिय अधिकारी, श्री.श्रीनिवास दांगट- प्रशासन अधिकारी, श्री.एस.एस.कुलकर्णी – सहा.आरोग्य अधिकारी, श्री.देवन्ना गट्टुवार – कार्यकारी अभियंता,श्री.दिलीप धुमाळ – उप अभियंता,विद्युत, श्री ओहोळ व्ही.बी. - उपअभियंता स्थापत्य, श्री.साबळे बी आर- उपअभियंता, श्री.किशोर महाजन – उपअभियंता (जलनि:सारण) , श्री.इनामदार एस जी. – मुख्य आरोग्य निरीक्षक, श्री.मोमीन ए. ए – कनिष्ठ अभियंता, श्री.गजपुरे व्ही पी, श्रीम.सानप ए.व्ही, श्रीम.घोडके पी पी,श्री.कलाल आय के – कनिष्ठ अभियंता स्थापत्य,श्री.आर एम बेद – आरोग्य,श्री.गणेश

राऊत,श्री.शिर्के एस व्ही,श्री.सतिष तायडे – विद्युत, श्री.बंडगर एस बी – जलनि:सारण, श्री.संदिप मो.पाडवी – कनिष्ठ अभियंता पाणीपुरवठा, श्री.मगर एस एम – कनिष्ठ अभियंता, श्री.बी के तापकिर – वृक्षसंवर्धन,श्री.कोळप श्रीकांत - अतिक्रमण, श्रीमती जोशी ए एम – पर्यवेक्षिका (शिक्षण विभाग) इ. कर्मचारी उपस्थित होते.

-----

**मा.सभापती**- सर्व सन्मा.सदस्य व अधिकारी यांचे स्वागत करुन सभेला सुरवात करणेत येत आहे.

सुचक - मा.अभिषेक बारणे अनुमोदक - निलेश बारणे

सन्मा.नगरसेविका आरतीताई सुरेश चौंधे यांचे पती श्री.सुरेश ज्ञानोबा चौंधे माजी पीसीएमटी चेअरमन यांचे तसेच महाराष्ट्र राज्याचे कृषी व फलोद्यान मंत्री मा.पांडुरंग फुंडकर साहेब यांचे दु:खद निधन झाले याकरीता २ मिनिटे स्तब्ध उभे राहुन श्रध्दांजली अर्पण करण्यात येऊन सभा १० मिनिटे तहकुब करण्यात आली.

दि. ७/५/२०१८ चे मासिक सभेचा सभावृत्तांत ( कार्यक्रमपत्रिका क्र. २ ) कायम करणेत येत आहे.

-------

ठराव क्रमांक - विषय क्रमांक- १

दिनांक- ४/०६/२०१८

सूचक- मा. अनुमोदक – मा.

**संदर्भ** – मा. संदीप वाघेरे यांचे दिनांक ०९/०५/२०१८ चे पत्र..

मा.संदीप वाघेरे यांचे दिनांक ०९/५/२०१८ चे पत्रानुसार प्रभाग क्र.२१ मध्ये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतर्फे बांधण्यात आलेल्या पिंपरी वाघेरे येथील जलतरण तलावास कै.दत्तोबा महादु वाघेरे असे नामकरण करण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव हा या पुर्वीचे सभेमध्ये मंजुर झालेला आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

------

ठराव क्रमांक - विषय क्रमांक- २

दिनांक- ४/०६/२०१८

सूचक- मा.संदीप वाघेरे अनुमोदक – मा.चंद्रकांत नखाते

**संदर्भ** – मा. संदिप बाळकृष्ण वाघेरे यांचे दिनांक ०५/०५/२०१८ चे पत्र

मा.संदिप बाळकृष्ण वाघेरे यांचे दिनांक ०५/०५/२०१८ चे पत्रानुसार प्रभाग क्र.२१ मध्ये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतर्फे त्यांना खालील प्रमाणे नामकरण

करण्यास मान्यता देणेबाबत विचार करणे

१) जलतरण तलाव - कै.दत्तोबा वाघेरे जलतरण तलाव तसेच तेथील

२) बहुउद्देशीय हॉल – कै.शहाजी वाघेरे (मास्तर) क्रीडा हॉल

सदर ठराव हा या पुर्वीचे सभेमध्ये मंजुर झालेला आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

------

ठराव क्रमांक - १५ विषय क्रमांक- ३

दिनांक- ४/०६/२०१८

सूचक- मा.निकिता कदम अनुमोदक – मा.उषा वाघेरे

**संदर्भ –** मा. हिरानंद उर्फ डब्बु किंमतराव आसवानी यांचे दिनांक १६/०५/२०१८ चे पत्र

मा.हिरानंद उर्फ डब्बु किंमतराव आसवानी यांचे दिनांक १६/०५/२०१८ चे पत्रानुसार

माजी प्राचार्य श्री.भगवानदास कोडोमल खिलानी हे जयहिंद हायस्कुलचे माजी प्राचार्य होते. त्यांच्या कार्यकिर्दीत त्यांनी जयहिंद हायस्कुल नावारुपाला आणले आहे, तरी त्यांचे नाव जिजामाता चौक ते जमतानी चौक दरम्यानच्या मार्गाला देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

------

## सभा कामकाजात ऐनवेळी दाखल करुन घेणेत आलेले विषय खालीलप्रमाणे

ठराव क्रमांक - १६ विषय क्रमांक- ४

दिनांक- ७/०५/२०१८

सूचक- मा.सविता खुळे अनुमोदक – मा.चंद्रकांत नखाते

**संदर्भ –** मा. सुनिता हेमंत तापकीर यांचे दिनांक ०४/०६/२०१८ चे पत्र

मा. सुनिता हेमंत तापकीर यांचे दिनांक ०४/०६/२०१८ चे पत्रानुसार प्रभाग क्रमांक २७ मधील तापकिरनगर येथील तुळजाभवानी मंदिरा समोरील गोंधळी समाजाची वसाहत असुन त्या वसाहतीस “तुळजा भवानी माता कॉलनी” असे नाव देण्यात यावे, तसेच प्रभाग क्र.२७ मधील अनिता प्रोव्हिजन स्टोअर्स, ज्योतिबानगर समोरील वसाहतीस दुर्गा माता कॉलनी असे नाव देण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

------

ठराव क्रमांक - १७ विषय क्रमांक- ५

दिनांक- ७/०५/२०१८

सूचक- मा.संदीप वाघेरे अनुमोदक – मा.कैलास बारणे

**संदर्भ –** मा. निलेश हिरामण बारणे यांचे दिनांक ०४/०६/२०१८ चे पत्र

मा.निलेश हिरामण बारणे यांचे दिनांक ०४/०६/२०१८ चे पत्रानुसार क्रांतिवीर नगर येथील ओरा, समर्थ लँनमार्क, ग्रँडकासा, यशोदा आंगण, अतुल्य रचना, ब्ल्यु ब्रिज, वर्धमान वाटीका फेज १, फेज २ या सोसायटीस नामफलक लावण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

------

ठराव क्रमांक - १८ विषय क्रमांक- ६

दिनांक- ४/०६/२०१८

सूचक- मा.अभिषेक बारणे अनुमोदक – मा.कैलास बारणे

**संदर्भ –** मा. झामाबाई बाळासाहेब बारणे यांचे दिनांक ०४/०६/२०१८ चे पत्र

मा.झामाबाई बाळासाहेब बारणे यांचे दिनांक ०४/०६/२०१८ चे पत्रानुसार प्रभाग क्र.२३ व २४ मधील राघवेंद्र स्वामी मठ ते पवार नगर नं.२ पर्यंतच्या रस्त्यास कै.बाजीराव बारणे पाटील मार्ग (बाजीराव रोड) असे नामकरण करणेकामीच्या प्रस्तावास पुर्वी ब प्रभाग समिती सभेत मान्यता देणेत आली आहे. सदर ठराव क्र.७४ दि.२२/१२/२०१६ रोजी मंजुर झाला आहे. पुन्हा आपण आपल्या ग क्षेत्रिय कार्यालयाच्या सभेत नामकरण विषयास मान्यता घ्यावी व २४ मी.डी.पी रस्त्यावरील रहिवासी सोसायटी दिशाफलकावर रस्त्याच्या नावाचा (बाजीराव रोड) उल्लेख करुन नामकरण फलक लावण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

------

दि.४/०६/२०१८ रोजी सकाळी ११.०० वाजता ग प्रभाग कार्यालयाचे मासिक सभेत खालीलप्रमाणे चर्चा झाली.

मा.प्रभाग समिती सभा १० मिनिटे तहकुब करण्यात येत आहे

**मा.बाबासाहेब (बाबा) त्रिभुवन -** प्रभाग समिती मासिक सभेसाठी अजुनही काही अधिकारी वेळेवर उपस्थित राहत नाहीत, सदर अधिका-यांवर योग्य ती कारवाई करणेत यावी.
मा.अभिषेक बारणे :- प्रत्येक कॉलनीतील ड्रेनेज मधील गाळ काढणे महत्वाचे आहे. सदर कामासाठी Private Agency नेमण्यात यावी.
मा.गोपाळ माळेकर :- कच-याची गाडी रोजच्या रोज येत नाही.
मा.प्रभाग अधिकारी – सध्याची ड्रेनेजची परिस्थीती काय आहे, यासाठी संबंधित अधिका-यांनी पाहणी करावी. आपापल्या डिपार्टमेंटनी Field वर जाऊन पाहणी करावी. ड्रेनेज व स्थापत्य विभागास अंतिम नोटीस देण्यात येत आहे. पुढील आठ दिवसात सर्व कामे पुर्ण करावे. चेंबर्सची झाकणे बंद आहेत का? याबाबत सर्व पाहणी करण्यात यावी. या कार्यात हयगय झाल्यास संबंधित अधिका-यांना जबाबदार धरणेत येईल.
(अंबिका कॉलनी व जय भवानी चौक येथे लवकरात लवकर कार्यवाही करावी)
मा.संदिप वाघेरे – ठेकेदाराची माणसं वाढवायला हवी.
मा.निलेश बारणे - पाण्याचा स्लोप मेंटेन करायला हवा.
मा.झामाबाई बारणे – प्रभाग क्र.२४ मध्ये पाणी/ड्रेनेज व कचरा संदर्भात अनेक समस्या आहेत, जे लोक काम करत नाहीत त्यांच्यावर कारवाई करा.
मा.सविता खुळे - वॉर्ड मध्ये औष्णिक धुरीकरणाची गाडी वेळोवेळी येत नाही.

मा.सुनिता तापकिर – अनधिकृत फ्लेक्स मुळे एकाचा  मृत्यु होण्यासारख्या घटना घडत आहेत असे असतांना यासंदर्भात अनधिकृत फ्लेक्सवर काय कारवाई केली. अतिक्रमण विभागाने काळजीपुर्वक कारवाई करावी

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ग क्षेत्रिय कार्यालय कार्यक्षेत्रात राहणा-या नागरिकांना अतिवृष्टीमुळे, नदी नाले व पुरामुळे धोका निर्माण होण्याचा संभव आहे.  असा धोका निर्माण झाल्यास त्वरीत कार्यवाही करुन जिवीत व वित्त हानी होऊ नये म्हणुन पुरनियंत्रणाबाबत तातडीचे व खबरदारीचे उपाय योजना करणे आवश्यक आहे.  त्यानुसार मनपा तर्फे पुरनियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आला असुन , त्यासंदर्भातील कामांचे सादरीकरण करण्यात आले.

वरीलप्रमाणे नेमुन देण्यात आलेल्या कामकाजाचा आढावा पुढील बैठकीमध्ये घेण्यात येईल असे सांगुन सर्वांचे आभार मानुन मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

**अध्यक्ष**
**ग प्रभाग समिती**
**थेरगाव– ३३.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
ग क्षेत्रीय कार्यालय, थेरगाव - ३३
क्र-गक्षेका/कावि/४/  /२०१८
दिनांक -  /०६/२०१८

**प्रशासन अधिकारी तथा सचिव (सभाशाखा)**
**क्षेत्रीय कार्यालय,**
**थेरगाव – ३३**

प्रत- सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२/- आपले विभागाशी संबंधित असणा-या विषयाबाबत झालेल्या
ठरावानुसार नियमाधीन कार्यवाही करणेत यावी, यासंदर्भात  वेगळा पत्रव्यव्हार केला जाणार नाही